**Manager**
Sau. Rashmi Patil

Vol-1 Issue-1
April 2021

ISSN-2250-0383
IMPACT FACTOR - 0.421


**Publisher**
ITIHAS SANKALN SANSTHA
ITIHAS SANKALAN SANSTHA, MAHARASHTRA

The Editor, Editorial Board and Publisher assume no Responsibility for statements and opinions expressed by the Author in this Research Journal

ITIHAS SANKALAN PATRIKA

# SHODHANKAN

International
Half Yearly
Peer Reviewed Referred
Research Journal



इतिहास संकलन संस्था, महाराष्ट्र
इतिहास संकलन पत्रिका
संपादक : प्रा.डॉ. राधाकृष्ण जोशी

( RNI MAH MUL 02988/13/1/2011 – TC VERIFICATION DATE 6/7/2011 )

ISSN – 2250-0383

International History Referred & Reviewed Research Journal

# SHODHANKAN

CHIEF EDITOR : Dr. RADHAKRISHNA L. JOSHI
ASSOCIATE EDITOR : Dr. NITIN ULHASRAO SARAF

EDITORS' BOARD

Dr. Venkatesh Lamb
Dr. Vinod Raipure
Dr. Shanta Gite Jadhavar
Dr. Pallavi Tajane

## अनुक्रमणिका


| अ क्र | लेखाचे शीर्षक | लेखकाचे नाव | पान नं. |
|---|---|---|---|
| १. | The Silk City Of Karnataka – Ramanagara | Dr.Vasudha.N | १ |
| २. | A study of local history of Aurangabad District | Dr. G. V. Gatti | ४ |
| ३. | Phone Radiation On Harmful: A Special Reference To Jalna City (Maharashtra State) | Dr. Khade Sominath Sarangdhar<br>Chate Vandana Vasantrao | ७ |
| ४. | वर्तमान परिप्रेक्ष्य में स्थानीय इतिहास का महत्व | डॉ.शुचिस्मिता मिश्रा | १२ |
| ५. | भारतीय इतिहास लेखन में स्थानिक इतिहास का महत्व | डॉ० सुरेश प्रसाद पाण्डेय | १६ |
| ६. | छत्रपती शाहू महाराज आणि खानदेशातील लामकानी गढी | डॉ. नरसिंह परदेशी - बघेल | १९ |
| ७. | अकोले गावचा स्थानिक इतिहास | डॉ. सुरेंद्र अर्जुन शिरसट | २३ |
| ८. | सुरगाणा संस्थाना संदर्भातील प्रशासकीय स्थित्यंतरे: विश्लेषणात्मक अवलोकन | डॉ.शीतल मनोज पंचीकर | ३१ |
| ९. | स्थानिक इतिहासलेखन : संकल्पना, साधने व महत्व | डॉ नवनाथ दत्तात्रय वाजगे | ३६ |
| १०. | स्वातंत्रोत्तर विसापूर : स्थानिक इतिहास लेखन | डॉ राजेंद्र पोपटराव भामरे | ३९ |
| ११. | लोणार तालुक्यातील बारव स्थापत्य : एक ऐतिहासिक संशोधन | डॉ. किशोर मारोती वानखडे | ४२ |
| १२. | चंद्रपूर येथील मराठा– इंग्रज युध्द(२० मे 1818) | दत्ता तन्नीरवार | ४७ |
| १३. | किल्ले वारुगड : एक दृष्टिक्षेप | प्रा.डॉ. संतोष तुकाराम कदम | ५३ |
| १४. | सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग व गोवा उर्फ हर्णे किल्ला {शिवकाल ते महाराणी ताराबाई काळ(ई. स. १६३० ई. स. १७०७)} | डॉ ज्योती पेठकर, | ५६ |
| १५. | गाविलगडचा किल्लेदार सरदार बेनीसिंग | डॉ संदीप राऊत | ६५ |
| १६. | यावलीच्या १९४२ स्वातंत्रलढ्यामध्ये जनसामान्याचा सहभाग- एक ऐतिहासिक अध्ययन | प्रा. डॉ. मंजूषा ह.धापूडकर | ६९ |
| १७. | नाशिक मधील सिन्नरच्या नावांच्या उत्क्रांतीचा इतिहास | डॉ.अंजली सोईतकर वेखंडे | ७५ |
| १८. | हैद्राबाद मुक्तिसंग्राम आणि संतभगवान बाबा | प्रा.कृष्णा उत्तम नागरे | ८१ |
| १९. | समकालिन ऐतिहासिक साधनांद्वारे फैजपूर येथील ग्रामीण राष्ट्रीय कॉंग्रेस अधिवेशनाचा स्थानिक इतिहास–एक अभ्यास | हितेश लिलाधर भोरटक्के | ८८ |
| २०. | 'मिरज तालुक्यातील गोंधळ लोककला आणि कलाकार' | अनुराधा पवार | ९७ |
| २१. | ''शिवकाल : मराठवाडयातील स्थानीक लोकजीवनाचा ऐतिहासीक अभ्यास'' | प्रा. डॉ. राधाकृष्ण ल. जोशी | १०१ |

15

HISTORY
ISSN – 2250-0383
RNI-02988/13/01/2011-TC

# गाविलगडचा किल्लेदार सरदार बेनीसिंग

डॉ. संदिप म. राऊत
इतिहास विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, मोर्शी
ता. मोर्शी, जि. अमरावती
मोबा. नं. : 9404689783

विदर्भ हा महाराष्ट्राचा अविभाज्य घटक आहे. विदर्भाचे पूर्व विदर्भ आणि पश्चिम विदर्भ असे दोन भाग पडतात. पश्चिम विदर्भ म्हणजे वऱ्हाड होय. वऱ्हाड मधील अमरावती जिल्हयातील चिखलदरा हे थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिध्द आहे. गाविलगड किल्ला, व्याघ्र प्रकल्प, दुर्मिळ वनऔशधी, कॉपीचे उत्पन्न, येथील कोरकुंचे समाजजिवन, संस्कृती, सण, उत्सव अशा अनेक वैशिष्ट्याने नटलेले ठिकाण म्हणजे चिखलदरा होय. सातपुडा पर्वतरांगेत गाविलगड हा डोंगरी किल्ला आहे. हा किल्ला नागपुरकर भोसल्यांची आर्थिक राजधानी होती. तसेच लष्करी दृष्टीने ही अत्यंत महत्वाचा होता.

1803 मध्ये इंग्रज मराठा दुसरे युध्द झाले. त्यामध्ये असई, अडगांव व गाविलगड अशा तीन महत्वपूर्ण लढाया झाल्या यात इंग्रजांविरुध्द भोसल्यांचा अतिशय शुर पराक्रमी व इनामदार सरदार बेनीसिंगाने पराक्रमाची शर्थ केली.

बेनीसिंग हा नागपुरकर भोसल्यांचा सरदार होता. सरदार बेनिसिंग हा एक राजपूत सरदार होता. राजपूत ही जमात शुर पराकमी आणि दिलेल्या वचनावर कायम असणारी अशी सर्वसामान्य तीची ओळख आहे. राजपूतांचा व्यवसाय शिपायीगिरी हा होता. शिपायीगिरी करुन आपली स्वातंत्र ओळख निर्माण करुन नावलौकीक मिळवणारी अनेक राजपूत कुंटूबे भारतीय इतिहासात मिळतात. बेनिसिंगाचे मुळचे घराणे रायबरेली जिल्हयातील गडेडी येथील होते. गडेडी येथून आपले नशिब आजमावण्याकरिता बेनिसिगांचा आजोबा झामसिंग याने नबाबाची नोकरी पत्कारली होती.[1]

बेनिसिंगाचे पूर्वज झामासिंग हा पहिल्या रघुजी राजेंना बंगालच्या स्वारी मध्ये मिळाला होता. पहिल्या रघुजी भोसल्यांना छत्रपती शाहू महाराजांनी बंगाल प्रांतात चौथाई वसूलीचे हक्क बहाल केले होते. या सनदेनुसार रघुजी भोसल्यांनी बंगालवर अनेक स्वारी केल्या. मात्र बंगालच्या नवाबाने चौथाई देण्यास नकार दिला. इतकेच नव्हे तर रघुजींना अडविण्यासाठी नवाबाने सरदार झामसिंग व बक्षीराम यांच्या नेतृत्वाखाली सैन्य पाठविले. दोन पक्षामध्ये घनघोर युध्दझाले. त्यात झामसिंग निकराने लढला व जखमी होऊन भोसल्यांचा कैदी झाला. झामसिंगचे शौर्य पाहून रघुजी भोसले भारावून गेले. त्यानी झामसिंगला म्हटले, "झामसिंग तुझा पराक्रामावर आम्ही खुश आहोत तुम्ही नवाबाकडे किवा तुमची ईच्छा असेल तिकडे जावू शकता. आमच्या सेवेत आला तर योग्यते प्रमाणे कामगिरी देऊ "असे सांगून त्याचा सन्मान केला. त्यावर झामसिंग म्हणाला "महाराज मी एकदा नवाबाची नौकरी पत्करली होती आता दुसरा कुणाची नोकरी पत्करणेमाझ्या कुळाला जमले नाही. पण माझा मुलगा प्रमोदसिंग लहान आहे त्याला जर तुम्ही चाकरीत घेतले तर त्यासाठी मला आली सेवा करावे लागेल[2] असे सांगितले.नागपूरला आल्यानंतर प्रमोदसिंगवर वऱ्हाडातील सर्वच किल्लाची देखरेख करण्याची जबाबदारी दिली. राहण्याचे मुख्य ठिकाण गाविलगंड ठरविले, भोसल्याची राजकीय राजधानी जरी नागपूर होती तरी आर्थिक आणि लष्करी राजधानी ही गाविलगड होती. गाविलगडवर भोसल्यांचा खजिना होता. राजे मोहिमांवर गेल्यास तसेच हवापालटासाठी भोसल्याच्या कुटुंबाचा मुक्काम गाविलगडवर राहत असे. झामसिंगने गडाच्या संरक्षणाची व तेथील खजिनाचा रक्षणाची जबाबदारी अतिशय निष्ठापूर्वक पूर्ण केली. प्रमोदसिग ने देखील इमान राखून कामगिरी केली. अनेक युध्दात त्याने अतुलनीय पराकम केला. परंतु प्रमोदसिंगचा लष्करी मोहिमेत मूत्यू झाला. झामसिंग व प्रमोदसिंग या दोघांनीही अतिशय प्रामाणिकपणे पराक्रमाची शर्थ करुन भोसल्यांची सेवा केली.

प्रनोदसिंगच्या नंतर गाविलगड किल्ल्याची जबाबदारी त्याचा पूत्र बेनिसिंग याच्याकडे आली. बेनिसिग हा भूर होता. त्याला लहानपणापासून रणांगणावरील डावपेचाची जाणीव होती. त्यांच्या कुटुबांतील शूर लढवय्यादर्यावसिंगांने त्याला रणांगणावर आपल्या बरोबर नेऊन सर्व डावपेच शिकवले होते.[3] त्यामुळे शौर्य, पराक्रम व तलवारबाजीत तो निष्णात झाला. लष्करी गुण व संघटन कौशल्य त्यांच्या अंगी निर्माण झाले. त्यामुळे अल्पावधीतच किल्लेदार म्हणून त्याचा दरारा निर्माण झाला. नरनाळा, गावीलगड व मेळघाटातील इतर लहान मोठे किल्ले बेनिसिंग जमादार राजपूतांच्या ताब्यात होते. प्रत्येक किल्लावर त्यांच्या तर्फ किल्लेदार असत.[4]

1799 मध्ये लॉर्ड वेलस्लीने ब्रिटीश सत्ता विस्तारण्यासाठी तैनाती फौजेची निर्मीती केली. 1802 मध्ये बाजीराव दुसरा पेशवा सोबत वसईचा तह झाला नंतर शिंदे, होळकर व भोसले या मराठा सरदारांनी देखील तहाचा स्वीकार करावा त्यासाठी प्रयत्न केले पण त्यात यश न मिळाल्याने मराठ्याविरुध्द 1803 मध्ये युध्दाला सुरवात झाली. 23 संप्टेबर 1803 मध्ये इग्रंज आणि शिंदे व भोसले यांच्यात असईची लंढाई झाली. जनरल वेलस्लीने आपल्या फौजेचे दोन भाग केले. एक भाग कर्नल मॅक्सवेल यांच्या हाताखाली देवून सरदार बेनीसिंगाच्या फौजेकडे पाठविले या वेळी बेनीसिंगकडे सहा हजार घोड दळाची तुकडी होती. तसेच कही पायदळ देखील होते.[5]

23 संप्टेबरला प्रत्यक्ष युध्दाला सुरवात झाली जुवा आणि खेळणा नदीच्या मध्ये उभे असलेल्या बेनीसिंगच्या पायदळावर हल्ला करण्याचा आदेश मॅक्सवेल याने दिला. दोन्ही सैन्य परस्परांशी भिडले बेनिसिंगाचे सैन्य पराक्रमाची शर्थ करीत होते. सरदार बेनिसिंगाने योग्य संधी मिळताच आपले घोडदळ घेवून कर्नल मॅक्सवेल वर आक्रमण केले. माक्सवेल गोंधळून गेला. नाइलाज म्हणून युध्दाचा रंग पलटण्यासांठी कर्नल मॅक्सवेल आपल्या खास तुकडीसह बेनिसिंगला रोखण्यासाठी त्याला आडवा झाला. बेनिसिंगाने आपला घोडा मॅक्सवेलकडे वळविला. काय घडते हे लक्षात येण्याआधी कर्नल मॅक्सवेलचे शिर धडावेगळे झाले. अधिकारी पडला तरी कवायती इग्रजी फौज बराच वेळ लढत राहिली. बेनीसिंगच्या फौजेला कैफ चढला होता. दुपारपर्यंत इंग्रजी फोजेचा हा सपूर्ण तिसरा भाग जवळ जवळ गारद झाला. या युध्दात ब्रिटीशांना विजय मिळाला असला तरी बेनीसिगांने मोठा पराक्रम गाजविला.

यानंतर दुसरी लढाई अडगावला झाली. दि 29 नोव्हेबर 1830 रोजी शिरसोली तालुका आकोट जिल्हा अकोला जवळ भोसले याचे युध्दझाले या युध्दाला अडगावची लढाई असे म्हणतात. या युध्दात बेनीसिंग स्वतः हजर नव्हता परंतू त्यांचे सैन्य होते. इग्रज सैन्यांचे नेतृत्व ऑर्थर वेलस्ली व स्टिव्हसन यांच्या कडे होते. या दोन्ही सैन्या मध्ये घनघोर युध्द झाले. बेनीसिंगच्या फौजेने इग्रज फौजेचे खुप नुकसान झाले. या युद्धात भोसल्याचा सेनापती मनोहरबाबू. (मन्याबाह्यु) माराला गेला. मराठ्याच्या फौजेचा पराभव होऊन इग्रजांचा विजय झाला. अडगावचे इग्रज मराठा युध्द इतिहासात प्रसिध्द आहे. या युध्दात जे इंग्रज अधिकारी सैनिक शहिद झाले. त्यांच्या स्मृती उजाळा देण्यासाठी दरवर्षी त्यांच्या कुटुबांतील मंडळी अडगावच्या युध्द भूमीवर येवून मेनबत्ती प्रज्वलीत करुन शहिदाच्या स्मृतीस उजाळा देतात.[6]

असई आणि अडगांव या दोन्ही लढाईत ब्रिटीशाचा विजय झाला परंतु बेनिसिंग व त्यांच्या सैन्याने खुप पराकम गाजविला.यात ब्रिटीश फौजेचे फार नुकसान झाले व अनेक इंग्रज अधिकारी ठार झाले.या दोन्ही लढाई नंतर बेनिसिंगचा बदला घेणे व भोसल्यांची आर्थिक व लष्करी राजधानी गाविलगड ताब्यात घेणे. या हेतुने आर्थर वेलस्लीन मोर्चा गाविलगडकडे वळविला. 5 डिसेंबर ते 15 डिसेंबर या दरम्यान ही लढाई झाली. वेलस्ली हा ऐलिचपुरला 5 डिसेंबर 1803 ला आला व दोन मुक्काम करु गाविलगडकडे गेला. [7] आर्थर वेलस्ली एलीचपुरला जाण्याचे कारण गाविलगड हा अभेदय किल्ला होता. तसेच त्याने गाविलगडाचा किल्लेदार बेनीसिंगाचा पराक्रम असई व अडंगावच्या लढाईत पहिला असल्याने एलिचपुरच्या नबाबाचे सहकार्य मिळविणे आवश्यक होते.

वेलस्लीने लष्करी डावपेच म्हणून सैन्याचे दोन विभाग केले. एका तुकडीचे नेतृत्व स्वतः कडे तर दुसऱ्या तुकडीचे नेतृत्व कर्नल स्टिव्हनसनकडे दिले. बेनिसिंगच्या लष्कराचे विभाजन व्हावे, त्याला दोन आघाडयावर लढवावे अथवा एखाद्या आघाडीकडे त्याचे लक्ष न गेल्यास इंग्रजाची ती आघाडी यशस्वी होऊ शकेल हा हेतू होता. बेनीसिंहाच्या निष्णात हेरांनी बेनीसिंहाना दिलेल्या बातम्या त्यामुळे चुकल्या. केवळ वेलस्लीच्या नेतृत्वाखाली येणाऱ्या इंग्रज फौजांची बातमी मिळाली. म्हणून बेनिसिंगाने केवळ त्याच्याच प्रतिकाराची जय्यत तयारी केली. दुसऱ्या तुकडीचा मारा होण्याची शक्यता त्याला वाटली नाही वेलस्ली सैन्य घेवून 7 डिसेंबर 1803 गाविलगड किल्याच्या पायथ्याशी असलेल्या देवगांव नावाच्या गावी आला.[8]

वेलस्लीने स्टीव्हनसन या अधिकाऱ्याला गाविलगड किल्ल्याच्या उत्तरेकडील बाजुने हल्ला करण्यासाठी पाठविले. स्टीव्हसन अवघड तोफखाना घेवुन वेगळया मार्गाने निघाला. घाटातून तोफा चढविणे अतिशय कठीण काम होते. शिवाय डोंगरी वाटांची माहिती नव्हती. स्टीव्हनसन सोबत नबाब सलाबतखॉं होता. हे 30 मैल अंतर जाण्यास पाच दिवस लागले. स्टीव्हसन याने 12 डिसेंबरला लवादा खेडयाजवळ आपला तळ दिला.[9]

8 डिसेंबरला बेनिसिंगाने टेहळणी बुरुजावरुन देवगाव येथिल इंग्रजांची गडावर तोफा चढविण्याची धडपड बघितली.याचा सामना करण्यासाठी निवडक दोन हजार सैन्याची निवड केली. गाविलगडावरील तरुण मुले, स्त्रीया यांनाही योग्य त्या जबाबदाऱ्या वाटुन दिल्या. 9 डिसेंबरला वेलस्लीने चाचणीसाठी ले. कर्नल वॅलेसच्या अधिपत्याखालील फौज अचलपुर दरवाजावर पाठविली या फौजेला तटावर हल्ला करणे सोपे व्होवे म्हणून इंग्रजांनी तोफांचा मारा सुरु केला. इंग्रजी फौज आर्धी अधिक चढल्यानंतर बेनिसिंगाने अचलपूर दरवाज्यावरुन निवडक पायदळासह इंग्रज फौजेवर हल्ला केला. त्याच वेळी गडावरुन कालभैरव व बिजली या महाकाय तोफा गरजल्या. मलिकखानाने अचूक नेमबाजीने मारा करुन इंग्रजांचे आघाडीच्या तोफाचे मोर्चे उधडून टाकले. इकडे बेनिसिंगाने इतकी जबर धडक दिली की, इंग्रजांचे कवायती सैन्य, चार्मस आणि वॅलेस कसेबसे देवगांवला येऊन पोहचले.[10]

वेलस्लीच्या नेतृत्वात इंग्रजांचे सैन्य शिस्तीने गड चढण्यास लागले. ते पाहुन बेनिसिंगाने आपले निवडक सैन्य दक्षिण तटावर उभे केले. तटावर दगडाचे ढीग रचवयास सुरुवात केली. तटावर मिडणाऱ्या इंग्रज सैन्यावर दगड व गरम पाणी फेकण्याची जबाबदारी मुले आणि स्त्रियांवर बेनिसिंगाने सोपविली. इंगज सैन्यात मात्र शिस्त होती.[11]

11 डिसेंबरला इंग्रजांच्या सैन्यावर बेनिसिंगाने दरवाजा उघडुन हल्ला केला. मोठया प्रमाणात कापाकापी केली. बेनिसिंग व त्याच्या सैन्याने अतुल पराकम दाखवित देवगाव पर्यंत इंग्रज सैन्य मागेरेटले. ही लढाई दिवसभर चालली. शत्रुपक्षाचा खरपुस समाचार घेवुन तो गडावर आपल्या जखमी सैन्यासह निघून गेला. त्यामुळे इंग्रज सैन्याने बेनीसिंगाच्या पराकमाचा धसका घेतला होता. त्यामुळे वेलस्ली बेचेन होता. त्याची खरी भिस्त ही उत्तरेकडुन होणाऱ्या स्टिव्हनसनच्या हल्ल्यावर होती.[12]

वेलस्लीने दुसऱ्या आघाडीवर स्टीव्हनसनला पाठविल्याने बेनिसिंग व त्याला दोन आघाडयावर लढावे लागले. स्टीव्हनसन याने 12 जानेवारीला तोफाचा मारा करण्याची योग्य जागा निवडून तोफाचे मोर्चे लावले. तिकडे वेलस्लीनेही आपल्या पांगलेल्या फौजेची जमवाजमव करत 13 डिसेंबरला पिरफत्ते या गाविलगडच्या दक्षिण वेशीवर तोफानी हल्ला चढविला.[13] कॅप्टन यंगने गाविलगडच्या दिल्ली दरवाजावर गोळे टाकण्यास सुरुवात केली आपला मारा योग्य दिशेने होतो आहे किंवा नाही हे तो पाहत होता. मलिकखानाने त्याला हेरले व बिजली तोफेचे तोंड फिरवून निशाना घेवुन बत्ती दिली. तोफेतून सुटलेल्या गोळयांने कॅप्टन यंगला जमिनीवर लोळविले.[14]

14 डिसेंबरला बेनिसिंगाने दरबार भरविला. तेथे त्याने म्हटले,"साथीदारांनो गडावरील दारुगोळा संपला आहे. उलट इंग्रजाचा दारुगोळा आग ओकत आहे. लवकरच गडावर तोफाचे गोळे येऊन पडतील. आपण चिरडून जाऊ. कोंडून घेऊन गड लढविला तर आणखी काही दिवस आपण गढ लढवू शकू. पण आपला एकही सैनिक शिल्लक राहणार नाही. नागपूरचा संरक्षणाची तयारी करण्यात सर्व गुंतले आहे. उदया सकाळी जेवढा होईल तेवढा खजीना गडावरील स्त्रिया घेवुन उटलेल्या सैनिकांना वस्तापूर दरवाज्यातून नरनाळा किल्यावर पाठविण्याचा निर्णय मी घेतला आहे. मी स्वतः, रायोजी व मलिकखान गडावर राहुन उदया सकाळी 10 वाजता दिल्ली दरवाजा उघडुन इंग्रजावर तुटुन पडणार आहे. फुकट मरण्यापेक्षा शत्रुचा होईल तेवढा सफाया करुन राज्याची सेवा करणार आहोत.[15] यावरुन बेनीसिंगाला जीवापेक्षा राज्याची व खजिण्याचे किती महत्व होते हे स्पष्ट होते.

15 डिसेंबर ला स्टिव्हसनने किल्यावर मारा सुरु केला. इंग्रज लष्करासोबत किल्यावरील सैनिकांनी निकराची लढाई केली. या लढाईत ब्रिटीशांचे 14 लोक मेले, 114 जखमी झाले. कर्नल केनी लढाईत झालेल्या जखमामुळे मरण पावला. त्यामानाने मराठयांची प्राण हानी जास्त झाली. स्वतः किल्लेदार, त्याचे प्रमुख अधिकारी व किल्यावरील शिबंदी मारल्या गेली. भोसल्यांचा भाऊ व्यंकोजी मारल्या गेला.[16] यातच सरदार बेनिसिंग व त्यांचे साथीदार धारातिर्थी पडले आणि त्यांच्या स्त्रियांनी जोहार करुन प्राणांच्या आहुत्या दिल्या.

1803व्या इंग्रज–मराठा दुसऱ्या युध्दात झालेल्या असई, अडगांव, गाविलगड या तिनही लढायांमध्ये सरदार बेनीसिंगाने फार मोठा पराकम गाजविला. बेनीसिंगाने अखेरच्या श्वासापर्यंत जीवा पेक्षा राज्य महत्वाचे वाटत होते हे स्पष्ट होते. ऑर्थर वेलस्ली सारख्या निश्णात सेनापतीला 7–8 दिवस

झुंजवत ठेवले. या वेलस्लीने पुढे 1815 मध्ये युरोप विजेत्या नेपोलियन बोनापार्टला वाटर्लच्या लढाईत पराभुत केले. तो जनरल वेलस्ली लिहीतो, "नेपोलियनला पराभूत करण्यात जे यश मिळाले याचे कारण आपण युध्दातील डावपेचांचे धडे भारतात अडगांव गाविलगडच्या लढाईत शिकलो."[17] अशी कबुली दिली आहे. यावरुन सरदार बोनिसिंगच्या शौर्याची आपणाला कल्पना आल्याशिवाय राहत नाही.

- **संदर्भ ग्रंथ :**


1. चिखले, भैय्या, गाविलगडचे वऱ्हाडच्या इतिहासातील महत्व, (अप्रकाशित) 2015 प्र. 150
2. देशमुख, विजयसिंह, गाविलगडची गौरवगाथा, प्रकाशक, निर्मला तरार, जनसाहीत्य प्रकाशन, अमरावती, 1989, पृ. 20, 21
3. कित्ता, पृ. 22
4. काळे, या. मा., नागपूरकर भोसल्यांचा इतिहास, प्रकाशक मु. बा. देवपुजारी, विदर्भ संशोधक मंडळ, नागपुर, 1979, पृ. 226
5. पित्रे, का. रा., मराठयांचा युध्देतिहास, कॉन्टीनेटल प्रकाशन, पुणे, 2000, पृ. 210
6. देशमुख, विजयसिंह, गाविलगडची गौरवगाथा, प्रकाशक, निर्मला तरार, जनसाहीत्य प्रकाशन, अमरावती, 1989, पृ. 22
7. देशपांडे य. खु., एलिचपूर वऱ्हाडची जुनी राजधानी, प्रकाशक–दामोदर सावळाराम आणि मंडळी, शारदाश्रम, यवतमाळ, 1934, पृ. 95
8. काळे. या. मा., वऱ्हाडचा इतिहास, प्रकाशक, या. मा. काळे, बुलढाणा, 1924, पृ. 26
9. कोठे, प्रशांत, अचलपुरचा इतिहास, प्रकाशक सरसाहित्य केंद्र, नागपुर, 2013, पृ. 80
10. काळे या. मा., नागपुरकर भोसल्यांचा इतिहास, प्रकाशक मु. बा. देवपुजारी, विदर्भ संशोधक मंडळ, नागपूर, 1979 पृ. 227
11. देशमुख, विजयसिंह, गाविलगडची गौरवगाथा, प्रकाशक, निर्मला तरार, जनसाहीत्य प्रकाशन, अमरावती, 1989, पृ. 22
12. चिखले भैय्या, गाविलगडचे वऱ्हाडच्या इतिहासातील महत्व, (अप्रकाशित) 2015 प्र. 150, पृ. 133
13. देशमुख, विजयसिंह, गाविलगडची गौरवगाथा, प्रकाशक, निर्मला तरार, जनसाहीत्य प्रकाशन, अमरावती, 1989, पृ. 62
14. कोठे, प्रशांत, अचलपुरचा इतिहास, प्रकाशक सरसाहित्य केंद्र, नागपुर, 2013, पृ. 82
15. देशमुख, विजयसिंह, गाविलगडची गौरवगाथा, प्रकाशक, निर्मला तरार, जनसाहित्य प्रकाशन, अमरावती, 1989, पृ. 70
16. पित्रे का. रा., मराठयांचा युध्देतिहास, कॉन्टीनेटल प्रकाशन, पुणे, 2000, पृ. 233
17. चिखले भैय्या, गाविलगडचे वऱ्हाडच्या इतिहासातील महत्व, (अप्रकाशित) 2015 प्र. 150, पृ. 140